आहेत. मराठीसह इंग्रजी, हिंदी किंवा कोणत्याही प्रादेशिक भाषेत या सूचना पाठवता येणार आहेत. त्यासाठी 78 27 04 28 30 या क्रमांकावर 'hptf' टाईप करून whatsapp द्वारे सूचना पाठवता येतील. 1800-180-4747 या टोल फ्री क्रमांकावरही या सूचना सांगता येतील. किंवा examreforms-taskforce.dopt.gov.in या वेबसाइटवर किंवा ExamReformsTaskforce@dopt.gov.in या इमेलवर या सूचना पाठवता येतील.

<><><><><>

सीएसआयआर- युजीसी नेट संयुक्त प्रवेश परीक्षेतल्या पाचही विषयांसाठी राष्ट्रीय परीक्षा संस्थेनं निकाल आणि उत्तरतालिका प्रसिद्ध केली आहे. त्यातल्या उत्तरांविषयी काही शंका असल्यास उमेदवारांनी एनटीए संकेतस्थळाच्या हेल्पडेस्कवर संपर्क साधावा, असं एनटीएने म्हटलं आहे.

<><><><><>

बिहार सरकारनं यंदाच्या शैक्षणिक सत्रापासून इयत्ता दहावी आणि बारावीच्या बोर्ड परीक्षांच्या गुणपत्रिकेवर नापास हा शब्द न वापरता कौशल्य विकासासाठी पात्र असा उल्लेख करण्याचा निर्णय घेतला आहे.

परीक्षेत अपेक्षित गुण मिळवू न शकलेल्या विद्यार्थ्यांना बिहार बोर्ड ऑफ ओपन स्कूलिंग अँड एक्झामिनेशन मार्फत राबविण्यात येणाऱ्या व्यावसायिक आणि कौशल्य प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणं, हा या निर्णयामागचा उद्देश आहे.

<><><><><>

पंजाबमध्ये २७ ऑगस्ट रोजी सामुहिक रजेवर गेलेल्या राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्याचे निर्देश पंजाब राज्य सरकारनं दिले आहेत. अनधिकृतपणे अनुपस्थित राहिलेल्या कर्मचाऱ्यांवर नियमानुसार शिस्तभंगाची कारवाई करावी अशी सूचनाही पंजाब सरकारनं केली आहे. महागाई भत्ता, जुनी निवृत्तीवेतन योजना पुन्हा सुरु करावी यासह आपल्या इतर प्रलंबित मागण्यांसाठी तसंच सेवाविषयक प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी पंजाब राज्य सरकारचे लाखो कर्मचारी आणि निवृत्तीवेतनधारकांनी संप केला आहे.

<><><><><>

